# COMPOST FERTILIZER PROJECT (COMPOSTING LIQUIED CULTURE)

PR-37

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना

फॅक्स क्रमांक २५६०११५४.

दूरध्वनी क्रमांक २५६०११५३
२५६९७३४१
२५६०११६०
२५६०११५४

गणेशखिंड, पुणे ४११००७

दिनांक १४/०७/२०१८

संदर्भ क्र. विविमं/२०१८–१९/३९

प्रति,
मा. प्राचार्य
श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर
समाजभूषण गणपतराव काळभोर आर्ट्स कॉमस अँड सायन्स कॉलेज
पत्ता: लोणी काळभोर ता.: हवेली(महानगर पालिका हद्द वगळून) जि: पुणे

**विषय : सेंद्रीय खत निर्मिती प्रकल्प आणि सेंद्रीयपूरक जीवाणू द्रावण (कंम्पोस्टींग लिक्वीड कच्लर) मान्यता.**

महोदय/महोदया,

वरील विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळामार्फत आपल्या महाविद्यालयात सेंद्रीय खतनिर्मिती प्रकल्पास मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार आपल्या महाविद्यालयास या प्रकल्पाकरिता रू. १०,००० पर्यंत अनुदान मंजूर करण्यात आलेले आहे. याव्यतिरिक्त होणारा जादा खर्च महाविद्यालयाने करावा. वरील मंजूर रक्कमेपैकी ५०% रक्कम म्हणजेच रू. ५,०००/– आपल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास मंडळाच्या खात्यावर इ.सी.एस/एन.ई.एफ.टी द्वारे वर्ग करण्यात येत आहे.

तसेच सेंद्रीय खत खड्ड्यामध्ये वारीमार्गावरील निर्माल्य व पत्रावळ्यांच्या स्वरूपात जमा केलेल्या कचऱ्यावर सेंद्रीय खतनिर्मितीस उपयुक्त १० लिटर सेंद्रीयपूरक जीवाणू द्रावण (कंम्पोस्टींग लिक्वीड कच्लर) घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. हे १० लिटर द्रावण आपण सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळ किंवा राष्ट्रीय सेवा योजना विभागातून संकलित करावे.

आपल्या महाविद्यालयातील सेंद्रीय खतनिर्मिती प्रकल्पात दिनांक ३ जुलै ते ३० जुलै २०१८ या वारीकाळातील दिवसांमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून सहभागी विद्यार्थीवारीतील विद्यार्थ्यांमार्फत गोळा केलेल्या निर्माल्यांचे विघटन करून मोठया प्रमाणावर कंपोस्ट खताची निर्मिती करावी.

दिनांक ३१ जुलै, २०१८ पर्यंत सदर उपक्रमाचा छायाचित्रासह अहवाल, खर्चाचा तपशील, त्यासंबंधीची मूळ देयके (नवीन वित्तीय धोरणानुसार) मा. प्राचार्यांच्या स्वाक्षरीसह या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. कळावे, ही विनंती.

डॉ. तोष्णे / डॉ. विक्रम – त्वरीत पूर्तता करावी

संचालक,(अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ/राष्ट्रीय सेवा योजना






JCB


सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
एस्.जी.के.कॉलेज,लोणी
काळभोर (विद्यार्थी कल्याण मंडळ)
सेंद्रीय खत निर्मिती प्रकल्प

# सेंद्रीय खत निर्मिती प्रकल्प अहवाल

लोणीकाळभोर हे गाव पुणे जिल्हातील हवेली तालुक्यातील पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्ग कमांक ९ वर पुण्यापासुन १० कि.मि.अंतरावर वसलेले गाव आहे.महाराष्टाच्या सांस्कृतिक क्षेत्रात एक मानाचे स्थान असणारी वारकारी परंपरा आहे.या पालखी सोहळयामध्ये आषाढी वारीला संत तुकाराम महाराजांची पालखी आळंदी येथून निघून पंढरपूरला जाते.समाजभूषण मामासाहेब काळभोर यांच्या प्रर्यत्नामुळे संत तुकारामांची पालखी लोणीकाळभोर गावमध्ये मुक्कामास येत असते.त्याकाळामध्ये हाजारोंच्या संख्यने वारकरी लोणीकाळभोरमध्ये मुक्कामास येत आसतात त्यांची गैरसोय होऊ नये यासाठी आमच्या महाविध्यालयाच्या वर्ग खोल्या व मैदान उपलव्ध करून दिले जाते. यांच्या जेवणाची व राहाण्याची सोय केली जाते.

संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळयामध्ये निर्माण होणारे निर्माल्य व राहीलेले अन्न पदार्थ याचे योग्य व्यवस्थापान व्हावे व पार्यावरण रक्षणाच्या हेतूने सावित्रीबाई फुले पुणे विध्यापीठ पुणे विध्यार्थी विकास मंडळामार्फत आमच्या महाविध्यालयास सेंद्रीय खत निर्मिती प्रकल्पासाठी मान्यता देण्यात आली.त्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विध्यापीठ पुणे यांच्याकडून या प्रकल्पासाठी १0000 रू अनुदान मंजूर करण्यात आले आहे. सेंद्रीय खत निर्मिती प्रकल्पासाठी १० लिटर सेंद्रीयपूरक जीवणू द्रावण कंम्पोस्टींग लिक्वीड कल्चर उपलव्द करून देण्यात आले.

आमच्या महाविध्यालयाच्या आवरात सेंद्रीय खत निर्मिती प्रकल्पासाठी १० ः १० खडडा घेऊन त्यामध्ये वारीकाळामध्ये संपुर्ण गावामधील निर्माल्य व घनकचरा महाविध्यालयातील स्वयंसेवकांच्या कडून गोळा करून तो खडडयामध्ये टाकून त्याच्यावर सेंद्रीयपूरक जीवणू द्रावण कंम्पोस्टींग लिक्वीड कल्वरचा थर टाकून त्याच्यावर मातीचे थर टाकून खडडा मुजवण्यात आला व त्यामाध्यमातून सेंद्रीय खत निर्मिती करण्यात आली आहे.

(प्रा. डॉ. निकम एस. आर.)
**विद्यार्थी कल्याण अधिकारी,**
समाजभूषण गणपतराव काळभोर महाविद्यालय
लोणी काळभोर, ता.- हवेली, जि.- पुणे.

Principal
Samajbhushan Ganpatrao Kalbhor
Art's Commerce & Science College
Loni Kalbhor, Tal. Haveli, Dist. Pune